# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ४४ वी बैठक दिनांक १६ जून २००५

## ठराव

मा.ना.रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ४४ वी बैठक दिनांक १६.६.२००५ रोजी पाटबंधारे सभागृह, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

**ठराव क्र. ४४/१**

**"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ४३ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ४४/२**

**"महामंडळाची आर्थिक स्थिती हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केलेला असल्याने याबाबत ठराव करण्यात आला नाही."**

**ठराव क्र. ४४/३**

**"ठराव करण्यांत येतो की, सन २००२-२००३ चा महामंडळाचा वार्षिक वित्तीय अहवाल, लेखा परिक्षण अहवालासह शासनास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. "**

**ठराव क्र. ४४/४**

**"ठराव करण्यात येतो की, मे.बी.टी.पाटील, बेळगांव यांचेकडील १५१.१२ लक्ष रकमेचे दोन्ही बँक हमीपत्रांचे नुतनीकरण करण्यास तसेच मे.बी.टी.पाटील यांना त्यांचेकडील स्थापत्य कामे १) वर्धनगड बोगदा क्र.१ व २) आंधळी बोगदा क्र.२ची कामे खालील अटींचे अधिन राहून स्वबळावर सुरु करुन पुढील दोन वर्षात पूर्ण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**१. निविदेतील विनिर्दिष्टे व दरानेच कामे पूर्ण करणे बंधनकारक आहे.**
**२. या कामाचे कोणतेही क्लेम्स मागणार नाही. तसेच कोणतीही जादाची मागणी करणार नाही.**
**३. या कामाचे बाबतीत कोर्टाकडे अथवा लवादाकडे विचारणा करणार नाही.**
**४. स्वबळावर काम करण्यास तयार असल्याने जेव्हा या कामासाठीनिधी उपलब्ध होईल त्याचवेळी बिले अदा करणेबाबत तसेच विहित प्रपत्रात संमतीपत्रक/ करारनामा सादर करण्यास सहमती देण्यात यावी.**

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

५. सदरचे काम टर्न कि निविदेवर संयुक्त अभियानाद्वारे असल्याने उर्वरित दोन भागिदारांनी स्थापत्य कामे मे.बी.टी.पाटील यांनी करण्यास हरकत नसल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे."

ठराव क्र. ४४/५

"ठराव करण्यात येतो की,

(१) डिंभे धरणातील २.९३७ अघफू अतिरिक्त पाणी माणिकडोह धरणामध्ये साठविण्यासाठी करावयाच्या बोगद्याच्या खर्चामूळे होणाऱ्या रु. १०२.७७ कोटी दायित्वास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. संयुक्त कुकडी प्रकल्पाच्या सुधारित प्रकल्प अहवालात या बोगद्याच्या कामाचा समावेश करावा.

(२) कुकडी प्रकल्पास ऐआयबीपी अंतर्गत निधी प्राप्त होत असल्यामुळे सदर बोगदयाचे कामास निधी उपलब्ध होण्याचे दृष्टिने हा प्रस्ताव ऐआयबीपी अंतर्गत प्रस्तावित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४४/६

"ठराव करण्यात येतो की, उरमोडी धरण परिसरातील लोकप्रतिनिधी व जनता यांची आग्रही मागणी विचारात घेऊन, उरमोडी धरणास व जलाशयास कै.श्रीमंत छत्रपती अभयसिंह राजे भोसले यांचे नांव देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४४/७

"ठराव करण्यांत येतो की,

१. नवीन मुठा उजवा कालव्याचे किमी. ० ते ३४ या लांबीसाठी पूर्णतः भुयारी जलमार्ग बांधण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चाचे दायित्व स्विकारण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

२. सदर भुयारी जलमार्गाचे प्रस्तावास तत्वतःमान्यता आहे. या कामाचा अंतर्भाव खडकवासला प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकिय मान्यतेसाठीच्या अहवालात करण्यास व भुयारी जलमार्गाचे काम सुरु करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ठरावानुसार प्रशासकिय मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस सादर करण्यात यावा.

ठराव क्र. ४४/८

"ठराव करण्यात येतो की,मे IL & FS, मुंबई या संस्थेने निरा देवघर प्रकल्प खाजगी सार्वजनिक सहयोग संकल्पनेतून पथदर्शी प्रकल्प म्हणून पूर्णत्वास नेण्यासाठी, त्यांची सल्लागार व उत्प्रेरक संस्था म्हणून त्यांचा या क्षेत्रातील ज्ञान,क्षमता व अनुभव लक्षात घेता, स्पर्धात्मक दर न मागविता थेट पद्धतीने एकूण रु.२५ लक्षच्या शुल्कावर नेमणूक करण्यास खास बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

सही/-
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे



सही/-
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

ठराव क्र. ४४/९

"ठराव करण्यांत येतो की, मौजे बेडग, ता. मिरज येथील गट क्र. ४२९ मधील ५७ आर व गट कं. ४३१ मधील २६ आर अशी एकूण ८३ आर जमिन, महामंडळास सदर जागेची किंमत रु. ६४,१३५/- मिळण्याच्या अटीवर श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग यांच्या आश्रमशाळेसाठी देण्यास जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४४/१०

"ठराव करण्यात येतो की, ४० व्या बैठकीमध्ये पारित करण्यात आलेला ठराव क्र. ४०/६ खालीलप्रमाणे सुधारित करुन कायम करण्यात येत आहे.

सुधारित ठराव क्र. ४०/६

ठराव करण्यात येतो की, "श्री. दत्तात्रय रामचंद्र चव्हाण यांना ठराव क्र. ४०/६ नुसार भाडेपट्टयाने ३० वर्षाकरीता दिलेली खडकवासला धरणाच्या बॅक वॉटर व आय.ए.टी जवळचा रस्ता यामधील १७,५२० चौ.मी. जागा सुधारित भाडे प्रथमवर्षी रु. २ लक्ष व त्यानंतर प्रत्येक वर्षी भाडेपट्टयामध्ये १० टक्के वाढ करुन भाडे करारावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ४४/११

"ठराव करण्यांत येतो की, इंद्रायणी नदीवर मौजे टाकवे (खुर्द) व मौजे बोरज, ता. मावळ, जि. पुणे येथे श्री. मनमोहन आनंद या खाजगी उद्योजकास त्यांचे खर्चाने बुडीत पूल तथा बंधारा बांधण्यास नियामक मंडळाच्या ३६/६ च्या ठरावान्वये दिलेल्या मान्यतेतील अट क्र. ४ खालीलप्रमाणे सुधारित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट क्र. ४ (सुधारित)

सदर नियोजित पूलाच्या स्लॅबची खालची पातळी कमीत कमी ६१३ मी. एवढी असावी.

इतर अटीत काहीही बदल नाही."

ठराव क्र. ४४/१२

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या दि. ३७ व्या बैठकीतील ठराव क्र. ३७/१० अन्वये नेचर क्लब, मायणी, तालुका खटाव, जिल्हा सातारा या संस्थेस मायणी तलावाच्या पूर्व भागातील १०० एकर जमीन वृक्षारोपण व फलोत्पादनासाठी रु. १/- प्रती वर्षी प्रती हेक्टर या नाममात्र भाडे कराराने देण्याचा निर्णय या ठरावाद्वारे रद्द करण्यांत येत आहे."

ठराव क्र. ४४/१३

"ठराव करण्यांत येतो की, टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गतची कामे ठराविक मुदतीत पूर्ण होण्याचे दृष्टीने भूसंपादनासाठी करावी लागणारी संयुक्त मोजणी खाजगी अभिरणाद्वारे करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे."



| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) | कार्यकारी संचालक |
| व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म, पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |